.. १=

वाचले :- १. म. चेअरमन, इंदिरा सेवा सोसायटी नंदुरबार यांचा दिनांक १२.११.८६ चा अर्ज.

२. शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्रमांक- एलआरएफ-३१८६/५५१/५२१७/ग.६ दिनांक २६.८.८७.

......

क्रमांक-१९८७/ब/कक्ष.१/बिनशेती.१/ 2४८४
जिल्हाधिकारी धुळे यांचे कार्यालय
धुळे दिनांक १० .९.१९८७

आ दे श :
========

शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्रमांक- एलआरएफ-३१८६/५५१/५२५७, ग.६. दिनांक २६.८.८७ अन्वये नंदुरबार स.नं. २७१-अ पैकी हे.०.८० आर जमीन, इंदिरा महिला सेवा सोसायटी म. नंदुरबार या संस्थेस अध्यापक विद्यालय, पशुधान पर्यवेक्षक प्रशिक्षण केंद्र, अनाथ निराधार बालकाश्रम क्रिडांगणा साठी मंजूर करणे बाबत आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने मी जिल्हाधिकारी धुळे असे आदेश देतो की, नंदुरबार येथील स.नं. २७१-अ पैकी हे.०.८० आर जमीन [पानांक २७९ वरील नकाशात १, २, ३, ४, अंकानी दर्शविलेल्या जमिनी लगत दक्षिणेकडील जमीन ] म. चेअरमन, इंदिरा महिला सेवा सोसायटी म. नंदुरबार या संस्थेस अध्यापक विद्यालय, पशुधान पर्यवेक्षक प्रशिक्षण केंद्र, अनाथ निराधार बालकाश्रम क्रिडांगणासाठी प्रतिवर्षी [ नाममात्र रुपये १/- [एक ] या भाडेपट्टयावर १५ वर्षाकरिता महाराष्ट्र जमिन महसूल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट ] नियम १९७१ मधील नियम ७ तरतुदीनुसार खालील शर्तीस आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

शर्ती :-
-----

१ ] सदरचा आदेश महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमांचे तरतुदीनुसार काढण्यात आला असून त्या सर्व तरतुदी अर्जदार संस्थेस बंधनकारक राहतील.

२ ] अर्जदार संस्था सदरचा भूखंड वर्ग २ वर धारण करील.

३ ] प्रश्नाधीन जमिनीचा वापर मंजूर केलेल्या कारणासाठीच करावा.

४ ] मंजूर केलेल्या जमिनीचा किंवा तिचा कोणताही भाग किंवा त्यातील कोणताही हितसंबंध राज्य शासनाच्या पूर्वानुमती शिवाय हस्तांतरित करु नये.

५ ] जागा मंजूरीच्या आदेशा पासून दोन वर्षाचे आंत सदरची जागा मंजूर केलेल्या प्रयोजनासाठी सर्व प्रकारे सिध्द केवाची व तिचा पूर्णतया त्याच प्रयोजनासाठी वापर करावा.

.. २ ..

६] मंजूर केलेल्या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

७] उक्त जमिन कोणत्याही वेळी राज्य सरकारच्या लेखी पूर्व परवानगी शिवाय नियोजित प्रयोजना व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजना करिता तात्पुरती किंवा कायम प्रकारे वापरात देवू नये.

८] जागेचा ताबा घेतल्या पासून दोन वर्षाचे ~~अंमल~~ कालावधीत त्या जागेत १०० चौ. मी. ला एक झाड या प्रमाणे सुयोग्य झाडांची लागवण करावी व त्यांची देखभाल करावी.

९] वरील शर्त क्रमांक १ ते ८ पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास सदर जमीन त्यावरील बांधकामासह सरकार ताबा घेईल.

१०] सदर जमिन कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी राज्य सरकारला हवी असल्यास त्या बाबतीत जिल्हाधिकारी यांच्या सहीचे जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे असे घोषणापत्र मंजूरी दिलेली व्यक्ती आणि राज्य सरकार यांना निर्णायक ठरेल किंवा भू संपादन अधिनियम १८९४ अन्वये राज्य सरकारने संपादनासाठी उक्त जमीन अधिसूचित केल्यास उक्त धारक किंवा व्यवस्थापकास ६ महिन्याची लेखी सूचना देवून सरकारने खालील ~~xxx~~ मार्ग अवलंबविणे कायदेशिर होईल.

कोणत्याही व्यक्तीचा हक्क किंवा अधिकार या पासून पूर्णपणे मुक्त अशी उक्त जमीन व त्या जमिनीवर उभारलेल्या कोणत्याही इमारती किंवा केलेले इतर बांधकाम नुकसान भरपाई देवून परत घेणे किंवा तिचा ताबा घेणे, नुकसान भरपाईची रक्कम ही जमीन परत घेण्याच्या वेळी उक्त जमिनीवर मंजूरी दिलेल्या उक्त व्यक्तीने अनधिकृतपणे बांधलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाम याचा खर्च किंवा मुल्य या पैकी जे कमी असेल त्यापेक्षा जास्त असणार नाही. या शर्ती खाली द्यावयाच्या भरपाईच्या रकमेच्या पर्यायाने संबंधी कोणताही प्रश्न उद्भवल्यास असा प्रश्न निर्णया करिता राज्य शासनाकडेस सोपवावा आणि राज्य शासनाचा अंतीम निर्णय असेल.

११] ही मंजूरी खाणी, खनिज पदार्थ आणि दगड खाणी यामधील शासनाच्या सर्व हक्काच्या आरक्षणास आणि दगड खाणीचे काम करणे व दगड खाणीचा शोध करणे या प्रयोजनाकरिता या क्षेत्रात प्रवेश करण्यास संहितेतील उपबंधा नुसार सर्व वाजवी सोयीसह पूर्ण मोकळीक असल्याच्या आधीन राहून देण्यात आली आहे.

१२] जमिन असेल त्या स्थितीमध्ये मंजूर करण्यात येत असून तिच्या विकासाचा खर्च धारकास सोसावा लागेल.

१३] महाराष्ट्र जमिन महसूल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट ] नियम १९७१ मधील नियम ७ नगत फॉर्म नं. २ मध्ये संस्थेने कबुलायत करुन द्यावी.

१४] वरील पैकी कोणत्याही शर्तीचा अनुग्राही संस्थेने भंग केल्यास सदरची जमीन त्यावरील बांधकामासह सरकार जमा करण्यात येईल.

स्थळ प्रतीवर

म. जिल्हाधिकारी सो. }
यांची स्वाक्षरी असे. }

सही/-
जिल्हाधिकारी धुळे करिता.

प्रति,
म. चेअरमन,
इंदिरा महिला सेवा सोसायटी नंदुरबार जि. धुळे.

प्रतिलिपी - मुळ कागदपत्रासह म. तहसिलदार नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व सत्वर कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- अर्जदार संस्थेकडून विहित नमुन्यात कबुलायत करुन इकडेस मंजूरीसाठी सादर करावी.

३/- संदर्भीय जमिनीचा अर्जदार संस्थेस ताबा देवून ताबे पावतीसह खुलासा करावा.

प्रत - म. जिल्हा निरिक्षक भूमी अभिलेख धुळे यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जिल्हाधिकारी धुळे करिता.

तहसिलदार नंदुरबार

Copy applied on- 11-10-2005 Copying Fee- 6-00
Copy Ready on- 11-11-2005 Compairing Fee 3-00
Copy Delivered on- 14-11-2005 Paper Fee-
Copied by- Search Fee- 1-00
Compaired by- Total- 10-00

TRUE COPY
Tahasildar Nandurbar